March - 2019

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. ०५ मा.अ.
दिनांक: ०१/३/२०१९

क्षा - ५
३०९९
२/३/१९

(5)

# जोडपत्र "अ"

(नियम ३ नुसार)

माहितीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

## माहितीचा अधिकार कायदा २००५ कलम ३ अन्वये अर्ज

प्रति,

जन माहिती अधिकारी
विधी अधिकारी
१ला मजला स्व इंदिरा गांधी भवन
भाईंदर (पं) ता.जि. ठाणे

10 रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES
- 1 MAR 2019

प्रेषक :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अपिलकाराचे पूर्ण नांव | : | मा.श्री.अखिल सुरेन्द्र प्रताप सिंह वं<br>मा.श्री.दयानंद तोमा पालन<br>मोबा: ९३२३५५९५३७ |
| २) | पूर्ण पत्ता | : | श्री. लक्ष्मीनारायण मोरे कंपाऊंड,<br>चामुंडा प्रसादीक बिल्डींग अ/८,<br>निळीकांत इंड. ईस्टेटच्या समोर,<br>पांडुरंग वाडी, पोस्ट मिरा (पूर्व),<br>जि. ठाणे - ४०१ १०४. |
| ३) | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील | : | दि. 25/01/2019 रोजी काशिमीरा पोलिस स्टेशन यानी दिलेल्या अर्ज बाबत |
| अ) | माहितीचा विषय | : | विधी विभागने वरील तपशील संबंधात सार्वजनिक बांधकाम विभागाची चौकशी करून दिलेल्या आदेशाची प्रती व वरील कागद पत्र व्यवहारिष केलेले कागद पत्र |
| (दोन) | माहितीशी संबधित कालावधी | : | 01-01-1960 आज पर्यंत |
| (तीन) | आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : | | |
| | १) वरील विषय व तपशील मध्ये चौकशी करून सार्वजनिक बांधकाम विभागाने मा.विधी विभागाल सदर केलेल्या सपूर्ण नस्ती संदर्भातील सपूर्ण पुराव्याची साक्षांकित पुरावे व कागद पत्र देण्याची कृपा करावे | | |
| | २) दि. 25/01/2019 रोजी काशिमिरा पोलिस ठाणे यानी दिलेल्या अर्जवर सार्वजनीक बांधकाम विभाग देण्या आलेल्या पत्र चे छायांकीत प्रति साक्षांकीत पत्र देण्याची कृपा करावे | | |
| | ३) | | |
| (चार) | माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीश:आवश्यक आहे किंवा कसे | : | स्वत: येवुन घेणार |
| (पाच) | अर्जदार, दारिद्रय रेषेखालील आहे किंवा नाही | : | नाही. |
| (सहा) | सोबत जोडण्यात आलेली प्रत | : | |

ठिकाण :
दिनांक : 01/03/19

१)मा.श्री.अखिल सुरेन्द्र प्रताप सिंह    २) मा.श्री.दयानंद तोमा पालन

काशिमीरा पोलीस स्टेशन
छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, काशिमीरानाका,
काशिगांव, (मिरारोड पुर्व) ता.जि.ठाणे फोननंबर ०२२-२८४५७३०१
Mail id : kashimirapstn@gmail.com
Website-www.thaneruralpolice.gov.in

प्रति,

दि. -२१.०१.२०१९

मा. विधी अधिकारी सो,
विधी विभाग, मिरा- भाईंदर महानगर पालीका,
यांना सविनय सादर ..

**रिपोर्ट** :- जगदीश एम.बांगर,पोलीस उप निरीक्षक,नेम.काशीमीरा पो.स्टे.
**विषय** :- कागदपत्रांची पडताळणी होवुन कायदेशिर कारवाई होणेबाबत ...
**संदर्भ** :- काशिमीरा पो.स्टे. जावक क्र. ५६४९ दि.१५.०७.२०१७ अन्वये

---ooo---

**महोदय,**

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर की, काशिमीरा पोलीस ठाणे आवक अर्ज क्र. ९९/२०१९ मधील अर्जदार श्री. दयानंद तोमा पालन वय – ४६ वर्षे, व्यवसाय – इस्टेट एजंट,रा. लक्ष्मीनारायण मोरे कंपाउंड, चामुंडा क्लासिक बिल्डींग जवळ, नितीशा इंडस्टी समोर, पांडुरंग वाडी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे. यांनी इकडील पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज केला असुन सदर अर्जातील मजकुर बाब ही अर्जदार यांचे मौजे महाजनवाडी मिरे येथील जमीन सर्व्हे नं जुना १२६/७ व नवीन सर्व्हे नं ५०/७, मधील ९१० मीटर या जागेवर गैरअर्जदार १) विनोद देवजी वाघरी, व त्याचा भाऊ २) गंगा देवजी वाघरी व आई श्रीमती ३) कमुबाई देवजी वाघरी यांनी बेकायदेशिर अतिक्रमण करुन पक्के रुमचे बांधकाम केले आहे तसेच त्यांनी खोटे दस्तऐवज सादर करुन, शासनाची दिशाभुल केली असुन सदरचे बांधकाम पाडुन , त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात यावी वगैरे मजकुराचा अर्ज इकडील कार्यालयात प्राप्त आहे.

सदर बाबत अर्जदार यांनी मिरा-भाईदर महानगरपालीकेत वारंवार पत्रव्यवहार करुनही आजपावेतो सदरचे बांधकाम पाडलेले नाही, तसेच संबंधीतांवर एमआरटीपी कायदयान्वयेय कोणतीही कारवाई केल्याचे दिसुन येत नाही, सदर जागेवर विनोद वाघरी व इतर यांनी बनावट दस्तऐवज सादर करुन बनावट नकाशा जोडुन मा. न्यायालयात अर्जदार यांचेविरुध दावा दाखल केला असुन त्याचा क्र. १) ४२२/२०१८ तसेच दुसरा दावा क्र. १०५०/२०१८ असे दावा दाखल करुन तो न्यायप्रविष्ठ आहे.

तरी अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी होवुन, तसेच सदर जागेची पाहणी करुन गगैरअर्जदार यांचेकडे चौकशी करुन दोषी आढळुन आल्यास त्यांचेविरुध्द एमआरटीपी कायदयानुसार संबंधीत विभागामार्फत कायदेशिर कारवाई करणेस विनंती आहे.

टिप - सोबत अर्जदार यांचा मुळ अर्ज, जबाब , व जागेसंबंधीत सर्व कागदपत्र जोडले आहेत.

मा.सविनय सादर ..

(जगदीश एम.बांगर)
पोलीस उप निरीक्षक,
काशीमीरा पोलीस स्टेशन

Received this Letter on 25/01/19 at 4:00pm

पोच
लिपिक
विधी विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

जबाब.

दि.- १९.०१.२०१९

मी दयानंद तोमा पालन वय – ४६ वर्षे, व्यवसाय – इस्टेट एजंट,रा. लक्ष्मीनारायण मोरे कंपाउंड, चामुंडा क्लासिक बिल्डींग जवळ, नितीशा इंडस्टी समोर, पांडुरंग वाडी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे. मोन – ८४५२९७२०२० समक्ष काशिमीरा पो स्टे, आ. अर्ज क्र.९९/१९ चे चौकशीमध्ये विचारलेवरुन जबाब लिहुन देतो की,

मी वरिल ठिकाणी १२ वर्षापासुन माझे परिवारासह राहत असुन काशिमीरा जमीन सर्व्हे नं १२६/७ या जागेवर कच्चे पत्र्याचे शेड बांधुन, ते भाडेतत्वावर देवुन त्यातुन मिळणा-या उत्पन्नावर माझा उरनिर्वाह चालवितो.

मी सन – २०१२ साली श्री. लक्ष्मीनारायण मोरे, रा. श्रीवर्धन, रायगड यांचेडुन जुना जमीन सर्व्हे १२६/७ व नवीन सर्व्हे नं ५०/७, मधील ९१० मीटर ही जागा विकत घेतली असुन ती माझे नावावर करण्याचा प्रस्ताव मिरा-भाईंदर महानगर पालीका कार्यालयामध्ये प्रस्तावीत असुन सदर जागेवर सध्यस्थितीत माझा कब्जा आहे. मी सदर जागेवर पत्र्याचे रुमचे बांधकाम केले असुन त्याचे शासन दप्तरी कायदेशिर नोंद केली आहे. त्यानंतर सन - २०१६ साली अचानक विनोद देवजी वाघरी, व त्याचा भाऊ गंगा देवजी वाघरी व आई श्रीमती कमुबाई देवजी वाघरी यांनी बेकायदेशिर अतिक्रमण करुन पक्के रुमचे बांधकाम केले आहे. सदर बाबत मी मिरा-भाईदर महानगरपालीकेत वारंवार पत्रव्यवहार करुनही आजपावेतो सदरचे बांधकाम पाडलेले नाही. त्यानंतर सदर बाबत मी विनोद वाघरी यास समक्ष विचारले असता, तो माझे जागेवर स्वतःचा हक्क सांगत असुन, त्याच्याकडे सदर जागेचे कागदपत्र असल्याचे त्याने मला खोटे सांगीतले, तसेच सदर जागेविरुध्द मा. ठाणे कोर्टात दावा दाखल केला , तेव्हा मी विधी विभाग , मिरा- भाईंदर महानगर पालीका यांना पत्रव्यवहार करुन, माहीती अधिकार कार्यालयामार्फत कागदपत्र मागवुन पडताळणी केली असता, विनोद वाघरी यांनी जोडलेला बनावट नकाशा प्राप्त करुन , मा. भुमी अभिलेख ठाणे यांचेकडे माहीती अधिकारान्वये माहीती मागवुन पाहीले असता, सदरचा नकाशा हा बनावट असल्याचे मला समजले, त्यावरुन मी विधी विभाग व काशिमीरा पोलीस ठाण्यात विनोद वाघरी यांचेविरुध लेखी तक्रार दाखल केली आहे.

सदरचे बांधकाम हे माझे जागेवर असुन ते बेकायदेशिर असल्याने , ते काढुन टाकण्यासाठी मी मिरा-भाईंदर महानगर पालीकेमध्ये पत्रव्यवहार केला आहे, परंतु अदयापपावतो कोणतीही कारवाई केली नाही, तसेच विनोद वाघरी व त्याचे कौटुंबिय यांचेवर एमआरटीपी कायदयाअंतर्गत कारवाई केलेली नाही., मी सदर जागेचा कायदेशिर मालक असुन, विनोद वाघरी यांनी बनावट सादर केलेल्या

अर्जदार -: श्री. दयानंद तोमा पालन
श्री.लक्ष्मीनारायण मोरे कंपाउंड,
चामुंडा क्लासिक बिल्डींग जवळ,
नितिशा इंड. इस्टेट समोर,
पांडुरंग वाडी, मिरारोड-पुर्व,
ता.जि. ठाणे- ४०१ १०७

दिनांक : ०७/०१/२०१८

प्रति,
मा. विधी अधिकारी सो.,
विधी विभाग,
मिरा-भाईंदर महानगर पालिका,
भाईंदर-प., ता.जि. ठाणे

दावा क्र. 422/2018

विषय -: दा.कं. १०५०/२०१८ या दाव्यामधील पान नं. १४ मधील सर्वे नकाशा खोटे असल्याबाबत...

महोदय,

वरील विषयान्वये आपणांस कळवितो की, मौजे- महाजनवाडी (मिरे), ता.जि. ठाणे जु.स.नं. १२६ मधील सर्वे नकाशाची मागणी केलेली असतांना उप अधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचेकडून असे समजले की, आपणांकडे दावेदाराने सादर केलेले नकाशे हे मौजे- महाजन वाडी (मिरे), ता.जि. ठाणे यथील सर्वे नं. १२० पैकी चे सादर करून आपली दिशाभुल केलेली आहे. तरी सदरचे नकाशे हे धादांत खोटे आहेत. तरी चौकशी नोंदवही, उप अधिक्षक भूमी अभिलेख ठाणे यांनी दिलेल्या जबाबाची प्रत , माहिती अधिकाराची मागणी प्रत इ. आपणांकडे सादर करीत आहे त्याची नोंद घ्यावी व वरील दावेदारावर कायदेशिर कारवाई करावी ही नम्र विनंती.

कळावे,

07/01/2019
लिपिक
विधी विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

आपला विश्वासु,

श्री. दयानंद तोमा पालन

प्रत-: १. मा. पोलीस उपअधिक्षक सो. , मिरारोड पो. स्टे.
२. मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो., काशिमिरा पो.स्टे.

आ. क्र. ८८७८ ०७/०१/१९

9/1/19
पोलीस ठाणे अंमलदार
काशिमीरा पो.स्टे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचे कार्यालय
जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयाचे आवारात ठाणे ४०० ६०१
दुरध्वनी क्र.२५३८२१२९
E-Mail Id – dyslrthane.thane@yahoo.in

माहितीचा अधिकार २००५

क्र./भूमापन/ठाणे/मा.अ.३२५/२०१८ / ८९३८
ठाणे दि. २६ /१२/२०१८

६
नमुना पत्र – ब
(पहा (१२))

प्रति,
अर्जदाराचे नांव :- अखिल सुरेंद्र प्रताप सिंह व दयानंद तोमा पालन
अर्जदाराचा पत्ता :- लक्ष्मी नारायण मोरे कंपाऊंड, पांडुरंग वाडी, पो. मिरा (पू) जि.ठाणे

प्रेषक :- श्रीम. निलम तावडे
माहिती अधिकाऱ्याचे पदनाम
मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे

विषय :- केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत...

संदर्भ :- आपला दि.२८/११/२०१८ रोजीचा माहिती अधिकार अर्ज.

उपरोक्त विषयांकित बांबत आपला माहिती अधिकाराचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला असून, सदर अर्जात आपण मौजे – महाजनवाडी, ता.जिं.ठाणे जु.स.नं.१२६ चा.नं.१२७ आलेख क्र.१८ चौकशी नोंदवही व गटबुक बाबत मागणी केलेली आहे.

संदर्भिय अर्जात नमूद केलेली माहिती निमतानदार क्र.१ यांचे संकलनाशी संबंधित असल्याने माहिती अधिकार सेक्शन ५/५ अन्वये सदर अर्ज त्यांचेकडे वर्ग करणेत आलेला होता. सदर बाबत त्यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,

आपण मागणी केल्याप्रमाणे मौजे – मिरे ता.जि.ठाणे येथील आलेख क्र.१८ चे चौकशी नोंदवहीचे अवलोन केले असता चा.नं.१२७ हा स.नं.१२० पै त्यास न.भू.क्र.३००१ असा नमूद असून क्षेत्र १७.९ चौ.मी. दाखल आहे. आपल्या प्रमाणे मौजे मिरे येथील आलेख क्र.१८ चा.नं.१२७ क असा नमूद नाही. मौजे महाजनवाडी मिरे ता.जि.ठाणे येथील आलेख क्र.१८ चा.नं.१२७ ची चौशी नोंदवही या कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध आहे. तरी आपण अर्जात मागणी केलेप्रमाणे चौकशी नोंदवहीची पडताळणी करुन आपणास आवश्यक असलेली माहिती शासकीय फी भरणा करुन, उपलब्ध करुन घ्यावी. ही विनंती.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवार, कोर्ट नाका, ठाणे (प) ४०० ६०१ या कार्यालयाशी माहिती संदर्भात अपिलीय अधिकारी श्री. अमर कांतीलाल ढोकले, उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे हे आहेत. आपणांस अपील करावयाचे असल्यास ३० दिवसाचे आत अपील सादर करता येईल.

आपली विश्वासू,

जन माहिती अधिकारी तथा
प्र. मुख्यालय सहाय्यक
उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे

(नियम ३ नुसार)
माहितीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना
माहितीचा अधिकार कायदा २००५ कलम ३ अन्वये अर्ज

प्रति,
जनमाहिती अधिकारी
उप अधिक्षक भुमि अभिलेख,
ठाणे (पश्चिम).


| | | | |
|---|---|---|---|
| १) | अपिलकाराचे पूर्ण नांव | : | मा.श्री.अखिल सुरेन्द्र प्रताप सिंह व<br>मा.श्री.दयानंद तोमा पालन<br>मोबा.८४५२९७२०२० / ८९५६४६८२२२ |
| २) | पूर्ण पत्ता | : | श्री.लक्ष्मीनारायण मोरे कंपाऊंड,<br>चामुंडा क्लासीक बिल्डींग जवळ, निकीशा इन्ड. ईस्टेटच्या समोर, पांडुरंग वाडी, पोस्ट मिरा (पूर्व),<br>जि.ठाणे - ४०१ १०४. |
| ३) | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील | : | मौजे महाजनवाडी येथील (जुना) सर्व्हे नं.१२६ (नविन) सर्व्हे नं.५० हिस्सा नं.७ बाबत. |
| अ) | माहितीचा विषय | : | मौजे मिरे, महाजनवाडी येथील (जुना) सर्व्हे नं.१२६ (नविन) सर्व्हे नं.५० हिस्सा नं.७ येथील आलेख क्र.१८ चालता नंबर १२७क ची चौकशी नोंदवही व संबंधित कागदपत्रांच्या संपूर्ण नस्ती मिळणेबाबत. |
| (दोन) | माहितीशी संबंधित कालावधी | : | ०१.०१.१९६० ते आजपर्यंत |
| (तीन) | आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : | | |
| | १) वर नमूद तपशील व माहितीच्या विषयाबाबत आलेख क्र.१८ चालता नंबर १२७क ची चौकशी नोंदवही तसेच नकाशाच्या चारही दिशेला असणाऱ्या मिळकतींची पूर्ण माहिती तसेच संबंधित गटबुक नकाशे व इतर संबंधित कागदपत्रांच्या संपूर्ण नस्तीच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत. | | |
| | २) वर नमूद तपशील व माहितीच्या विषयाबाबत आलेख क्र.१८ चालता नंबर १२७क ची प्रत मिळणेसाठी अर्जदार श्री.देवजीभाई सबाभाई वाघरी यांनी केलेल्या अर्जाच्या व अर्जासोबत जोडलेल्या सहपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत. | | |
| (चार) | माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे | : | व्यक्तीशः |
| (पाच) | अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे किंवा नाही | : | नाही |
| (सहा) | सोबत जोडण्यात आलेली प्रत | : | |

ठिकाण : ठाणे
दिनांक : २८.११.२०१८

१) मा.श्री.अखिल सुरेन्द्र प्रताप सिंह

२)मा.श्री.दयानंद तोमा पालन

मौजे भीवा तालुका ठाणे सदोल आलेख क्र. १८ पालता नंबर १२८क ची अर्जदार श्री देवजी काई खलाभाई बादशी याचे दिनांक १०/२/८२ चे अर्जावरून नकाशाची कामापुरती नक्कल




वि. जि. नि. भू. अ.
तथा वी. अ. क्र. २ ठाणे/भिवंडी



१:५००

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०३/२०१८-१९
दि. १५/०३/२०१९

प्रति,

श्री. अखिल सुरेंद्र प्रताप सिंह
लक्ष्मी नारायण मोरे कंम्पाउंड, चामुंडा क्लासिकच्या बाजूला,
निकिशा इंडस्ट्रियल इस्टेटच्या समोर, महाजनवाडी, मिररोड पुर्व
ता. जि. ठाणे

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**

**संदर्भ :-** आपला दि. ०१/०३/२०१९ रोजीचा अर्ज.

**महोदय,**

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण दि. २५/०१/२०१९ रोजी काशिमिरा पोलिस स्टेशन यांनी दिलेल्या पत्राच्या अनुशंगाने केलेल्या कार्यवाहीची खालील मुद्यांनुसार माहिती अपेक्षिली आहे. तरी आपणास खालीलप्रमाणे मुद्देनिहाय माहिती देत आहे.

**मुद्दा क्र. १ :-** दि. २५/०१/२०१९ रोजी काशिमिरा पोलिस स्टेशन यांनी दिलेल्या पत्राच्या अनुशंगाने विधी विभागाने सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दि. ३१/०१/२०१९ रोजी पत्र देऊन आपणास माहिती देणेस कळविले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर पत्राच्या अनुशंगाने इकडिल विभागास माहिती दिलेली नाही. तरी सदर मुद्याबाबत आपण सदर माहितीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अर्ज करण्यात यावा.

**मुद्दा क्र. २ :-** दि. २५/०१/२०१९ रोजी काशिमिरा पोलिस स्टेशन यांनी दिलेल्या पत्राच्या अनुशंगाने विधी विभागाने सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दि. ३१/०१/२०१९ रोजी दिलेल्या पत्राची प्रत जोडून देत आहे.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. विजयकुमार म्हसाळ, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Seenadke

16/03/2019

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका